Regi[illegible]red No. B. [illegible]

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 24TH JUNE 1897.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८६३ चा आक्ट २० वा (सरकारास धर्मसंबंधी धर्मादायांची व्यवस्था आपणाकडून काढून टाकतां येण्याबाबद आक्ट) सुधारण्यासाठीं आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थी ब्रिटिश हिंदुस्थानांतील सार्वजनिक प्रकारच्या धर्मसंबंधी व औपकारिक संस्थांच्या व धर्मादायांच्या कारभारासंबंधी सन १८६३ चा २० वा आक्ट सुधारणें योग्य आहे; त्या अर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

१. (१) या आक्टास सन १८९८ चा धर्मसंबंधी धर्मादायांबाबदचा आक्ट सुधारण्याविषयीं आक्ट असें ह्मणावें. लहान सरनामा, व्याप्ति, लागू होणें व सुरुवात.

(२) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे व तो, ख्रिस्ती धर्माच्या नाहींत अशा ज्या सार्वजनिक प्रकारच्या धर्मसंबंधी व औपकारिक संस्थांचें व धर्मादायांचें वार्षिक उत्पन्न दोनशें पन्नास रुपयांखालीं नसेल त्या सगळ्या संस्थांस व धर्मादायांस लागू आहे; आणि

(३) तो सन १८९८ च्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेरोजीं अमलांत येईल.

२. या आक्टांत, विषयावरून किंवा संदर्भावरून बाध येत नसेल तर,— व्याख्या.

(१) "धर्मसंबंधी व औपकारिक संस्था" या संज्ञेंत देवालयें, मशिदी, पगोडे, श्रैन्स (देवस्थानें) आणि औपकारिक संस्था हीं कोणत्याही स्थानिक नांवानें प्रसिद्ध असलीं तथापि त्या सर्वांचा, आणि धर्मादाय ह्मणून दिलेली किंवा खरेदी घेतलेली जी मिळकत व तत्संबंधी यात्रेकरूंनीं दिलेल्या ज्या देणग्या कोणत्याहि मनुष्याची स्वतःची मिळकत ह्मणून व त्यास दिलेल्या देणग्या ह्मणून नसतील ती मिळकत व त्या देणग्या धर्मसंबंधी किंवा औपकारिक किंवा इतर कारणांस लावलेल्या असल्या तथापि त्या सर्वांचा, समावेश होतो:

(२) "ट्रस्टी" या शब्दांत, ट्रस्टमध्यें असलेली कोणतीहि संस्था किंवा तशा कोणत्याहि संस्थेची मिळकत ज्यांच्या ताब्यांत किंवा व्यवस्थेंत असेल ते मनुष्य कोणत्याहि स्थानिक नांवांनीं प्रसिद्ध असले तथापि त्या सर्व मनुष्यांचा समावेश होतो:

(३) "दिवाणी कोर्ट" ह्मणजे सदहू संस्था ज्या डिस्ट्रिक्टांत असेल त्या डिस्ट्रिक्टांतील डिस्ट्रिक्ट जज्जाचें कोर्ट.

निवडणूक करणारांच्या मंडळ्या बनविणें.

३. (अ) जेथें सन १८६३ च्या २० व्या आक्टांत सांगितल्या प्रकारची कमिटी स्थापन झालेली असेल त्या प्रत्येक डिस्ट्रिक्टांत त्या कमिटीनें, हा आक्ट ठरल्यापासून एक महिन्याच्या आंत, ज्या ज्या धर्माची किंवा पंथाची कोणतीहि संस्था त्या डिस्ट्रिक्टांत असेल त्या प्रत्येक धर्माच्या किंवा पंथाच्या पुढारी मनुष्यांचें एक रेजिस्टर तयार करून, त्यांची एक यादी सगळ्या सार्वजनिक कचेऱ्यांमध्यें व संस्थांमध्यें प्रसिद्ध केली पाहिजे. ह्या यादींत मुख्य जमीनधारणकरणारे, पंडित, मोलव्ही, व उपाध्ये यांचा, आणि ज्या अब्रूदार व ऐपतदार मनुष्यांचा तींत समावेश झाला पाहिजे असें सदहू कमिटीस वाटेल त्या सर्व मनुष्यांचा, समावेश केला पाहिजे. (ब) मात्र इतकेंच कीं जेथें जेथें अशी कोणतीहि कमिटी स्थापन केलेली नसेल त्या प्रत्येक डिस्ट्रिक्टाच्या दिवाणी कोर्टानें, हा आक्ट ठरल्यापासून एक महिन्याच्या आंत, प्रत्येक धर्माचे किंवा पंथाचे तीन तीन मनुष्य नेमून त्यांची, सदरीं सांगितलेली यादी तयार करून प्रसिद्ध करण्यासाठीं, एक कमिटी बनविली पाहिजे.

या यादींत दाखल केलेले प्रत्येक धर्माचे किंवा पंथाचे मनुष्य या आक्टाच्या कारणांसाठीं त्या डिस्ट्रिक्टांतल्या त्या त्या धर्माची किंवा पंथाची "डिस्ट्रिक्टांतील निवडणूक करणारी मंडळी" असती असें समजावें. परंतु ज्या कोणत्याहि मनुष्याची शिफारस करावी किंवा त्याच्या संबंधानें हरकत घ्यावी असें सदहूप्रमाणें तयार केलेल्या यादींतील दोन-तृतीयांश मनुष्यांस वाटेल, त्या मनुष्याचें नांव सदहू कमिटीनें दाखल केलें पाहिजे किंवा काढून टाकलें पाहिजे.

डिस्ट्रिक्ट कमिटी बनविणें.

४. सदहू कमिटीनें निवडणूक करणाऱ्या प्रत्येक मंडळीस, जी वेळ व जागा त्या कमिटीकडून ठरविण्यांत येऊन दरोबस्त सार्वजनिक कचेऱ्यांमध्यें व संस्थांमध्यें योग्य रीतीनें जाहीर करण्यांत येईल त्या वेळीं व जागीं जमण्याविषयीं, आणि त्या डिस्ट्रिक्टांतील त्या धर्माच्या किंवा पंथाच्या धर्मादायांवर निर्बंध ठेवण्यासाठीं बहुमतानें निदान तीनपासून पराकाष्ठा पांच पर्यंत मेंबर निवडून त्यांची डिस्ट्रिक्ट कमिटी बनविण्याविषयीं फर्माविलें पाहिजे.

मुख्य कमिटी बनाविणें.

५. कोणत्याहि प्रांतांतील प्रत्येक डिस्ट्रिक्ट कमिटीची निवडणूक झाल्यापासून एक महिन्याच्या आंत तिनें एक मत देणारा प्रतिनिधि निवडला पाहिजे. अशा मतें देणाऱ्या प्रतिनिधींनीं, सामायिक रीतीनें ठरविलेल्या वेळीं व जागीं एकत्र जमून बहुमतानें पराकाष्ठा पांचपर्यंत मेंबर निवडले पाहिजेत, आणि याप्रमाणें निवडलेल्या मेंबरांची, त्या धर्माची किंवा पंथाची "मुख्य कमिटी" बनेल, व तिचें सदर ठाणें ह्मणून जी कोणतीहि जागा सदहू कमिटी बहुमतानें निवडील ती जागा तिचें सदर ठाणें असेल असें समजावें.

निवडणूक करणाऱ्या मंडळीचा कसूर.

६ डिस्ट्रिक्टांतील निवडणूक करणाऱ्या मंडळीनें किंवा डिस्ट्रिक्ट कमिटीनें ४ थ्या व ५ व्या कलमांत फर्माविलेल्या निवडी न केल्यास, ज्या ज्या डिस्ट्रिक्टाची कसूर झाली असेल त्या प्रत्येक डिस्ट्रिक्टाच्या दिवाणी कोर्टानें आणि प्रांताच्या है कोर्टानें अनुक्रमें डिस्ट्रिक्ट व मुख्य कमिट्यांचे मेंबर नेमिले पाहिजेत.

कमिट्यांच्या मेंबरांनीं हुद्दा धारण करावयाची मुदत.

७. डिस्ट्रिक्ट कमिटी व मुख्य कमिटी यांनीं तीन वर्षांपर्यंत हुद्दा धारण केला पाहिजे, परंतु त्यांचे त्यांचे स्थानापन्न त्यांच्या जागीं हजर होऊन त्यांची सुटका होईपर्यंत त्या आपापल्या हुद्यावर राहतील आणि त्यांचे मेंबर पुनः निवडले जाण्यास लायक असतील. सदहू कमिट्यांनीं आपापला स्वतःचा चेअरमन निवडला पाहिजे व सर्व बाबतींचा बहुमतानें निकाल केला पाहिजे. प्रत्येक मेंबरास एक मत व चेअरमनास एक ज्यास्त निर्णायक मत देण्याचा अधिकार आहे असें समजावें.

मुख्य कमिटीचे अधिकार.

८. पहिली मुख्य कमिटी बनविण्यांत आली ह्मणजे लगेच तेंव्हांपासून पुढें, ३ ऱ्या कलमाच्या अ व ब रकमांमध्यें सांगितलेल्या कमिट्यांना या आक्टावरून दिलेले अधिकार त्या कमिटीस व तिच्या स्थानापन्नांस प्राप्त होतील असें समजावें.

कमिट्यांच्या मेंबरांना हुद्यावरून दूर करणें.

९. डिस्ट्रिक्ट कमिटीच्या किंवा मुख्य कमिटीच्या ज्या कोणत्याहि मेंबरानें गैरवर्तणूक, किंवा जेणेंकरून तो आपल्या जागेस नालायक होईल अशी कोणतीहि वर्तणूक, केल्याचें आढळून येईल तो मेंबर बाकी मेंबरांच्या सर्वानुमतें हुद्यावरून दूर केला जाण्यास पात्र असेल असें समजावें.

कमिट्यांतील रिकाम्या झालेल्या जागांबाबद तजवीज

१०. कोणताहि मेंबर मरण पावल्याच्या, त्यानें राजीनामा दिल्याच्या किंवा त्यास हुद्यावरून दूर केल्याच्या कारणानें जी कोणतीहि जागा रिकामी होईल ती सदरील ४ थ्या व ९ व्या कलमांतील ठरावांबरहुकूम भरली पाहिजे. याप्रमाणें निवडलेल्या मेंबरानें किंवा मेंबरांनीं फक्त, कमिटीनें हुद्दा धारण करावयाच्या मुदतींतील जेवढा अवकाश बाकी राहिलेला असेल, तेवढ्याच अवकाशापर्यंत हुद्दा धारण केला पाहिजे. डिस्ट्रिक्ट कमिटी व मुख्य कमिटी यांनाहि, त्यांच्या हुद्याची मुदत संपल्यावर, त्याच रीतीनें निवडलें पाहिजे.

निवडणूक करणाऱ्या मंडळ्यांच्या यादींची तपासणी.

११. प्रत्येक मुख्य कमिटीनें, आपल्या हुद्याच्या मुदतीच्या शेवटल्या वर्षाच्या पहिल्या तिमाहींत, डिस्ट्रिक्टांतील निवडणूक करणाऱ्या मंडळीच्या यादी कायम ठेवल्या पाहिजेत किंवा रद्द केल्या पाहिजेत, आणि त्याच वर्षाच्या शेवटल्या तिमाहींत, डिस्ट्रिक्ट कमिट्यांना व डिस्ट्रिक्टांतील निवडणूक करणाऱ्या मंडळ्यांना ४ थ्या व ९ व्या कलमांअन्वयें आपापल्या निवडी करावयास लावलें पाहिजे: मात्र इतकेंच कीं, अशा डिस्ट्रिक्ट कमिट्या किंवा डिस्ट्रिक्टांतील निवडणूक करणाऱ्या मंडळ्या त्याप्रमाणें निवडी न करतील तर, या कलमाअन्वयें दिलेले अधिकार अनुक्रमें प्रांताच्या हैकोर्टानें व डिस्ट्रिक्टाच्या दिवाणी कोर्टानें चालविले पाहिजेत.

डिस्ट्रिक्ट कमिटीचे अधिकार.

१२. प्रत्येक धर्माच्या किंवा पंथाच्या डिस्ट्रिक्ट कमिटीस, हा आक्ट ठरल्यानंतर ट्रस्टींच्या जागा जसजशा रिकाम्या होतील तसतशा, प्रत्येक संस्थेंत चालू असलेल्या रिवाजाप्रमाणें, ट्रस्टींच्या नेमणुका करण्याच्या कामासहित त्या धर्माच्या किंवा पंथाच्या संस्थांवर, त्या संस्था चालू राहण्यास विरुद्ध नाहीं असा पूर्ण निर्बंध ठेवण्याचा अधिकार आहे असें समजावें; मात्र ट्रस्टींना गैरवर्तणुकीबदल, डिस्ट्रिक्ट कमिटीनें किंवा मुख्य कमिटीनें दिलेले हुकुम न पाळण्याबद्दल, किंवा त्यांस नेमून दिलेलें काम करण्याचें वर्जिल्याबद्दल, यांत पुढें ठरविलें आहे तेवढें खेरीज करून, कामावरून दूर करण्याचा डिस्ट्रिक्ट कमिटीस अधिकार नाहीं असें समजावें.

डिस्ट्रिक्ट कमिटींचीं कामें.

१३. डिस्ट्रिक्ट कमिटीनें आपल्या ताब्यांतील संस्थांच्या मिळकतींसहित त्या संस्थांचें एक रेजिस्टर ठेविलें पाहिजे, आणि ट्रस्टीनें अशा दरोबस्त मिळकतींची एक यादी, डिस्ट्रिक्ट कमिटी ठरवील त्या वेळाच्या आंत, सादर केली पाहिजे. ट्रस्टींनीं प्रत्येक श्रेनबदल दरवर्षी मार्च महिन्यांत जमाखर्चाचें बजेट तयार करून त्यांत, डिस्ट्रिक्ट व मुख्य कमिट्यांना लागणाऱ्या एस्टाब्लिशमेंटाच्या खर्चाचा जो भाग त्यांनीं हिसेरशीनें द्यावयाचा तो दाखल केला पाहिजे, आणि तसेच माही किंवा तिमाही हिशोब सादर केले पाहिजेत. हे सर्व, डिस्ट्रिक्ट कमिटीच्या सल्ल्यानें मुख्य कमिटी ठरवील त्या नमुन्यांप्रमाणें ठेविले व सादर केले पाहिजेत.

बजेटांत फेरफार करणें.

१४. डिस्ट्रिक्ट कमिटी, आपणास योग्य वाटेल त्याप्रमाणें, सदहू बजेटांत बहुमतानें फेरफार करण्यास मुखत्यार आहे: मात्र असा फेरफार मुख्य कमिटीकडून मंजूर किंवा रद्द केला जाण्यास पात्र असेल असें समजावें.

मिळकतीची रखवाली.

१९. प्रत्येक संस्थेची मिळकत व तिचें उत्पन्न हीं या आक्टाच्या सुरुवातीस ज्यांच्या रखवालींत असतील त्यांच्याच रखवालींत राहतील: मात्र त्यांच्या सुरक्षितपणासाठीं मुख्य कमिटीच्या मंजुरीनें डिस्ट्रिक्ट कमिटी जे ठराव करील त्या ठरावांस सदर्हू रखवाली पात्र राहील असें समजावें.

मुख्य कमिटीस अपील.

१६. डिस्ट्रिक्ट कमिटीच्या हुकुमांवर मुख्य कमिटीकडे अपील चालेल, व मुख्य कमिटीनें केलेला निकाल अखेरचा असेल असें समजावें.

चौकशी करण्याचा मुख्य कमिटीचा अधिकार.

१७. प्रत्येक धर्माच्या किंवा पंथाच्या मुख्य कमिट्यांना, सन १८६३ च्या २० व्या आक्टाच्या १३ व्या कलमावरून दिलेल्या अधिकारांखेरीज आणखी, त्यांच्या निबंधास पात्र असणाऱ्या ट्रस्टींपाशीं जाब मागण्याचा व त्या ट्रस्टींनीं केलेल्या व्यवस्थेबाबद व त्यांच्या वर्तणुकीबाबद चौकशी चालविण्याचा अधिकार आहे असें समजावें. अशी चौकशी ज्या दिवाणी कोर्टाच्या हुकुमतींत चालली असेल त्या दिवाणी कोर्टानें, अशा मुख्य कमिट्यांच्या चेअरमनांकडून अर्जी आली असतां, अशा चौकशीच्या वेळीं दस्तऐवज हजर करण्याबाबद व साक्षीदारांनीं हजर होण्याबाबद जरूर असलेल्या प्रोसेसी काढल्या पाहिजेत.

डिस्ट्रिक्ट व मुख्य कमिट्यांना, त्यांच्यापुढें चाललेल्या कोणत्याही चौकशींत, शपथेवर पुरावा घेण्याचा अधिकार आहे असें समजावें, व त्यांचे मेंबर प्रत्येकीं व एकत्र मिळून आणि तसेच सदरीं सांगितलेल्या कोणत्याही संस्थेचे किंवा मिळकतीचे ट्रस्टी हे हिंदुस्थानच्या अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींच्या कायद्याच्या अर्थाप्रमाणें सरकारी नोकर आहेत असें समजलें पाहिजे.

कानू व पोट-कायदे.

१८. प्रत्येक धर्माच्या किंवा पंथाच्या मुख्य कमिटीस, त्या धर्माच्या किंवा पंथाच्या डिस्ट्रिक्ट कमिटीच्या सल्ल्यानें, सदर्हू मुख्य व डिस्ट्रिक्ट कमिट्यांच्या मेंबरांच्या निवडीबाबद, व त्यांच्या त्यांच्या हुकुमतींतील संस्थांच्या व मिळकतींच्या योग्य व्यवस्थेबाबद आणि सदरीं सांगितलेल्या ट्रस्टींनीं आपापलीं कामें योग्य रीतीनें करण्याबाबद, जरूर असलेले पोट-कायदे व कानू करण्याचा अधिकार आहे असें समजावें. हे पोट-कायदे व कानू आणि त्यांच्या त्यांच्या हुकुमतींतील संस्थांच्या व मिळकतींच्या कारभारासंबंधी वार्षिक रिपोर्ट हीं त्या त्या प्रांताच्या ग्याझेटांत प्रत्येक वर्षाच्या निदान जून महिन्याच्या पंधरावे तारखेच्या आंत प्रसिद्ध केलीं पाहिजेत.

कमिट्यांचा खर्च.

१९. हिशोब तपासण्याचा खर्च, किंवा कोणत्याही संस्थेची पाहणी करण्यासाठीं अगर जरूर पडेल तेव्हां तेव्हां स्थानिक चौकशी करण्यासाठीं नेमलेल्या कोणत्याही मेंबराचा फिरण्याचा खर्च, यासारखा सादिलवार खर्च खेरीज़करून, साधारणतः डिस्ट्रिक्ट कमिटीस दरमहा पराकाष्ठा पन्नास रुपयांपर्यंत खर्चानें व मुख्य कमिटीस दरमहा पराकाष्ठा शंभर रुपयांपर्यंत खर्चानें एक कचेरी व एस्टाब्लिशमेंट ठेवण्याचा हक्क आहे असें समजावें. ह्या खर्चाच्या रकमा डिस्ट्रिक्टांमधील निरनिराळ्या श्रेन्सवर, शक्य असेल तेथवर, हिसेरशीनें बसविल्या पाहिजेत, किंवा ज्या कोणत्याही श्रेनशीं त्याचा संबंध असेल त्याच श्रेनकडून वसूल केल्या पाहिजेत, आणि त्यांचा अनुक्रमें बजेटांमध्यें व संबंध असलेल्या श्रेन्सच्या किंवा श्रेनच्या हिशोबामध्यें समावेश केला पाहिजे.

सन १८६३ च्या २० व्या आक्टाच्या १८ व्या कलमाची सुधारणूक.

२०. सन १८६३ च्या २० व्या आक्टाच्या १८ व्या कलमांत " कोणताही दावा " या शब्दांच्या नंतर पुढील शब्द, ह्मणजे, "या आक्टाअन्वयें स्थापन झालेल्या कोणत्याही धर्माच्या किंवा पंथाच्या कोणत्याही मुख्य कमिटीनें आणला नसेल तर तो " हे शब्द दाखल करावे.

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

१. ह्या मसुद्याचा हेतु म्हटला म्हणजे विद्यमान कायद्याअन्वयें धर्मसंबंधी व औपकारिक धर्मादायांची जी व्यवस्था होत आहे त्या व्यवस्थेंत असलेलीं कित्येक व्यंगें दूर करणें हा होय.

२. ह्या मसुद्यांत विद्यमान ट्रस्टींना जेथले तेथें ठेवण्याची योजना केली आहे. या मसुद्यावरून अशा ट्रस्टींच्या स्थानापन्नांना, प्रत्येक संस्थेंत चालू असलेल्या रिवाजाप्रमाणें, ट्रस्टींच्या जागीं येण्याची मोकळीक दिली आहे. त्यावरून ट्रस्टची मिळकत व उत्पन्न हीं दरोबस्त, ज्यांच्या हातीं हल्लीं आहेत त्यांच्याच हातीं, कांहीं एक फेरफार न करितां, ठेविलीं आहेत. त्यावरून त्यांना जे खर्च रिवाजाप्रमाणें आजपर्यंत करण्यांत येत आहेत ते करण्याची मोकळीक दिली आहे, मात्र इतकेंच कीं ते खर्च करण्यापूर्वी ते बजेटांत दाखल केले पाहिजेत व त्या बजेटांत फेरफार करण्यासाठीं जो सादिलवार खर्च होण्याचा संभव असेल त्या खर्चाबदलहि तजवीज केली पाहिजे. हा फेरफार, फार दिवस चालत आलेल्या रिवाजास न जुमानतां कोणतीहि कमिटी वारंवार किंवा पुष्कळ करील असें आढळून येण्याचा संभव नाहीं.

३. निर्बंध ठेवणाऱ्या माणसांच्या खर्चाच्या संबंधानें म्हटलें म्हणजे, सार्वजनिक हितासाठीं बिनपगारी नोकरी करण्याची बहुतेक लोकांमध्यें जी महत्वाकांक्षा व तत्परता दिसून येते तिचा फायदा करून घेतला आहे, आणि योग्य रीतीनें काम करण्यास बरींच लायक अशीं कचेरीसंबंधी हाताखालचीं माणसें ठेवण्यासाठीं जो अतिशय कमी खर्च लागेल अशी कल्पना करतां येईल तेवढ्याच खर्चापुरती प्रत्येक धर्मादायावर वर्गणी बसविण्याचा ठराव केला आहे.

४. निर्बंध ठेवणाऱ्या मंडळीच्या रचनेच्या संबंधानें म्हटलें म्हणजे, या मसुद्यांत दरेक धर्मासाठीं किंवा पंथासाठीं दोन प्रकारच्या कमिट्या ठरविल्या आहेत. त्यावरून, डिस्ट्रिक्ट कमिट्यांनीं ट्रस्टींवर प्रत्यक्ष देखरेख ठेवावी असें व वरच्या प्रतीच्या कमिट्या कीं ज्यांस मुख्य कमिट्या असें नांव दिलें आहे त्यांनीं सामान्य देखरेख ठेवून डिस्ट्रिक्ट कमिट्यांच्या हातून घडलेल्या चुका दुरुस्त करण्यासाठीं व त्यांना पसंत होणाऱ्या व नापसंत होणाऱ्या बाबतींच्या परिणामांच्या संबंधानें उपाय करण्यासाठीं, अपील-कोर्टाप्रमाणें काम चालवावें असें ठरविलें आहे.

५. सदहू कमिट्या प्रत्येक धर्माच्या किंवा पंथाच्या उंच प्रतीच्या लोकांपैकीं निवडलेल्या असामींच्या बनाव्या असें ठरविलें आहे. अशा प्रतीच्या असामींची जी निवडणूक करणारी मंडळी बनेल ती सगळ्या व्यवहारोपयोगी कारणांसाठीं बस होईल असें वाटलें आहे.

६. सदहू कमिट्यांचे मेंबर हल्लींप्रमाणें तहाहयात हुद्दा धारण न करितां तो कांहीं वर्षांच्या मुदतीपर्यंत धारण करतील.

७. जे धर्मादाय एका वेळीं सरकारच्या प्रत्यक्ष निर्बंधाखालीं होते व जे त्याप्रमाणें नव्हते त्यांजमध्यें विद्यमान कायद्याप्रमाणें असणारा भेद नाहींसा करण्याचें या मसुद्यांत योजिलें आहे. कारण सदहू एका वर्गाची गैरवर्तणूक दुसऱ्या वर्गाच्या गैरवर्तणुकी इतकीच दूषणीय आहे.

८. ट्रस्टींच्या वर्तणुकीबाबद चौकशी करण्याच्या संबंधानें मुख्य कमिट्यांचे अधिकार वाढविण्याचें, व दावा करण्यास विद्यमान कायद्यावरून त्या कमिट्यांना जी पूर्वी मंजुरी घ्यावी लागते तशी मंजुरी घेण्याची जरूरी नाहींशी करून टाकण्याचें योजिलें आहे; तसेंच ट्रस्टी दिवाणी कोर्टाच्या फैसल्यानेंच मात्र हुद्यावरून दूर केले जाण्यास पात्र असल्यामुळें कमिट्यांच्या कोणत्याहि कृत्याच्या योगानें त्यांची जाचणूक न होतां ते हल्लींप्रमाणेंच निर्भय राहतील.

तारीख २२ वी मार्च, सन १८९७.

(सही) पी. अनंदा चार्लू.

(True translation).
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.